# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/निवडणुक/उ.नामनिर्देशन/अपिल/२०१५/ 13744
दिनांक : ७/०४ /२०१५

**वाचावे :** १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम १५२ (अ)
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४
३. इकडील जा.क्र.रासनिप्रा/निवडणुक प्रक्रीया घोषणा/४१०/२०१५ दि.१४/१/२०१५

**विषय : निबंधक हा निवडणूक निर्णय अधिकारी असलेस उमेदवाराचे नामनिर्देशन फेटाळण्यात आल्यास त्याविरुध्द अपिल करणेबाबत..**
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५२ (अ)

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) चे तरतुदी अन्वये, सहकारी संस्थेच्या सर्व निवडणुका घेण्यासाठी व त्यासाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण हे राज्य शासनाने गठीत केलेल्या " राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास " अधिकार प्राप्त आहेत. आणि,

ज्या अर्थी, राज्य शासनाने सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी उक्त अधिनियमान्वये तयार केलेले व दि.११/९/२०१४ रोजी अधिसुचीत केलेले महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ हे अंमलात आले आहेत. आणि,

ज्या अर्थी, उक्त नमुद नियमान्वये राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी, तालुका/ प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी नेमणुकीचे आदेश निर्गमित केलेले आहेत. आणि,

ज्या अर्थी, सहकारी संस्थांच्या समितीची निवडणुक प्रक्रियेमध्ये इच्छुक मतदार उमेदवारीकरीता नामनिर्देशनपत्र भरणेचा समावेश आहे. अशा प्राप्त झालेल्या नामनिर्देशनपत्रांची छाननी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम २५ अन्वये केलेनंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याव्दारे ज्या उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र मंजुर/ नामंजुर करणेची तरतुद आहे. आणि,

ज्या अर्थी, अशा नामंजुर करण्यात येणाऱ्या नामनिर्देशनाचे निर्णयावर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम १५२ (अ) मध्ये कोणत्याही संस्थेच्या समितीच्या निवडणुकीत उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आल्यामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आल्याच्या तारखेपासुन तीन दिवसांच्या आत निबंधकाकडे अपील दाखल करुन दाद मागणेची तरतुद आहे आणि अशा अपिलात नामनिर्देशनपत्र वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे वैध नामनिर्देशनांच्या यादीत समाविष्ट करण्याची तरतुद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम १५२ (अ) मध्ये व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम २६ मध्ये करण्यात आलेली आहे. आणि,

ज्याअर्थी, काही संस्थेवर संस्थेचे निबंधकाचीच निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन नियुक्ती होऊ शकते अशावेळी संबंधीत संस्थेच्या निवडणुक निर्णय अधिकाऱ्याने नामनिर्देशन पत्रावर घेतलेल्या नामंजुरीचे निर्णयावर त्या संस्थेच्या निबंधकास कलम १५२ अ प्रमाणे अपील नैसर्गिक न्यायतत्वानुसार चालवता येणार नाही.

त्याअर्थी जेव्हा संबंधीत संस्थेचे निबंधकच निवडणूक निर्णय अधिकारी असतील त्या संस्थेचे निवडणुक प्रक्रीयेत नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आलेल्या निर्णयावर त्या त्या उमेदवारांनी अपील कोणाकडे दाखल करावयाचे याबाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत :

**-: आदेश :-**

राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५२(अ) अन्वये प्राप्त अधिकारानुसार ज्या सहकारी संस्थाचे निबंधकच निवडणूक निर्णय अधिकारी असतील हे त्या संस्थांचे निवडणुक प्रक्रियेमध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम २५ अन्वये नामनिर्देशनपत्र नामंजुरीच्या निर्णयाविरुध्द करावयाचे अपीलाचे अपीलीय अधिकारी हे खालीलप्रमाणे असतील.

| अ.क्र. | निवडणुक निर्णय अधिकारी | अपीलीय अधिकारी |
|---|---|---|
| १ | जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक ,सहकारी संस्था . | अप्पर आयुक्त तथा विशेष निबंधक , सहकारी संस्था ,महाराष्ट्र राज्य.पुणे |

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण,पुणे यांच्या मान्यतेने.**

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

१.तालुका / वार्ड सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)
२.जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व).

**प्रत माहितीस्तव** : विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
**प्रत सस्नेह रवाना** :- १.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. संचालक, हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपुर
४. आयुक्त (दुग्ध विकास), महाराष्ट्र राज्य, अब्दुल गफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई
५. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

E:\pradhikaran1\letrs\उमेदवारांचे नामनिर्देशन.docx